पाठयनिर्देशिका या पदाच्या
नामाधिकरणाबाबत..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः पदना-२०२३/प्र.क्र. ३७३/सेवा ५

गो. ते. रुग्णालय, संकुल इमारत
१० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक : ०५ जून,२०२३

वाचा -

१) सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना क्र. सेप्रनि २०१९ /शुश्रूषा /प्र.क्र.१४० /सेवा-५, दि.२७.०२.२०२१

२) उपसंचालक आरोग्य सेवा (शुश्रृषा), मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/शुश्रृषा/ कक्ष -९/ टे-४/एकच पदनाम/ पाठयनिर्देशिका/१८९८/२३, दि.२५.०४.२०२३

३) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. डीएचसी ३०१०/प्र.क्र. १८८/आरोग्य-३, दि.०२.०२.२०११

शासन परिपत्रक -

आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील विविध शैक्षणिक आरोग्य संस्था (परिचर्या विद्यालय) यांच्या पदनिर्मितीच्या शासन निर्णयामध्ये सिस्टर टयुटर (पाठयनिर्देशिका)/ क्लिनिकल इंस्ट्रक्टर (चिकित्सालयीन निर्देशिका)/ शुश्रृषा अधिकारी (नर्सिंग ऑफिसर) /प्राचार्य ह्या असे नामभिदान झालेले आहे ही सर्व पदे पाठ्यनिर्देशकांची असल्याने दि.२७.०२.२०२१ रोजीच्या सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार फक्त पाठ्यनिर्देशिका/पाठ्यनिर्देशिक असे एकच नामाभिधान ठेवण्यात आले आहे.

तसेच, सन २०२१ पर्यंत सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करताना सिस्टर टयुटर (पाठयनिर्देशिका)/ क्लिनिकल इंस्ट्रक्टर (चिकित्सालयीन निर्देशिका) / शुश्रृषा अधिकारी (नर्सिंग ऑफिसर) अशी प्रसिध्द करण्यात येत होती. परंतु दि.२७.०२.२०२१ पासून सुधारित सेवाप्रवेश नियमात फक्त पाठ्यनिर्देशिका/पाठ्यनिर्देशिक हेच पदनाम असल्याने सन २०२१ पासून या पदांची सेवाज्येष्ठता ही पाठ्यनिर्देशिका/पाठ्यनिर्देशिक हे या एकाच पदानामाने प्रसिध्द करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत आरोग्य शैक्षणिक संस्थामध्ये कार्यरत असलेल्या अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांपैकी सेवाज्येष्ठतेनुसार सिस्टर टयुटर (पाठयनिर्देशिका)/ क्लिनिकल इंस्ट्रक्टर (चिकित्सालयीन निर्देशिका) यांचेपैकी ज्येष्ठ कर्मचाऱ्यास शुश्रृषा अधिकारी (नर्सिंग ऑफिसर)/प्राचार्य पदाचा कार्यभार करण्यात येतो.

विविध आरोग्य संस्थांच्या पदनिर्मितीमध्ये पाठ्यनिर्देशिकांच्या पदनामांचा उल्लेख शुश्रृषा अधिकारी/ क्लिनिकल इंस्ट्रक्टर/प्राचार्य असा होत असल्याने काही ठिकाणी पदनामाध्ये संभ्रम निर्माण होत असल्याने उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी हजर करून घेण्यास अडचणी निर्माण होत आहे. सिस्टर

टयुटर (पाठयनिर्देशिका)/ क्लिनिकल इंस्ट्रक्टर (चिकित्सालयीन निर्देशिका)/ शुश्रृषा अधिकारी (नर्सिंग ऑफिसर) ह्या पदांचे असलेले नामभिदान दि.२७.०२.२०२१ रोजीच्या सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार **पाठ्यनिर्देशिका/पाठ्यनिर्देशिक** असे अधिसुचित करण्यात आले आहे. ही बाब संबंधीत व कार्यालय प्रमुखांच्या निर्दशनास आणण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०६०५१२००५४९५१७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

ARCHANA VILAS WALZADE

Digitally signed by ARCHANA VILAS WALZADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=b17094004b015083dae757656e5d24847898197ddd6b0366a9177f097ed0887a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B4E19876AB3EEC36E3A3B988441648AB87470CDFE66B14CFBE7AC9BD770485C1, cn=ARCHANA VILAS WALZADE
Date: 2023.06.05 12:27:50 +05'30'

(अर्चना वालझाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
२. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई/पुणे.
३. सहसंचालक , आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) ,मुंबई.
४. उपसंचालक आरोग्य सेवा, प्रभारी मंडळे, महाराष्ट्र राज्य (सर्व).
५. सहाय्यक संचालक , (लेखा व लेखा परीक्षा), आरोग्य सेवा पुणे.
६. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व).
७. जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व).
८. सर्व परिचर्या प्रशिक्षण संस्था/विद्यालये/महाविद्यालये आरोग्य सेवा
९. महालेखापाल (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ , नागपूर.
११. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
१२. निवडनस्ती (सेवा-५).